1403

क्र. पोअय/वाचक/बाहेर राज्यात जाण्याची परवानगी बाबत /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 13 MAY 2025

# परिपत्रक

**संदर्भ :-** पोमसं/२१/७२७२/ई-ऑफीस क्र.१९११७४/२०२५ दि.०६.०५.२०२५

**विषय :-** **गुन्हयांचे तपासाकामी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्यातून बाहेरील राज्यात जाण्याची परवानगी मिळणेबाबत.**

--००--

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये, मा.अपर पोलीस महासंचालस (का.व.सु.) म.रा. मुंबई यांचे कार्यालयाकडून प्राप्त असून महाराष्ट्र राज्यातून इतर राज्यात शासकीय कामासाठी जाताना पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये योग्य ते आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तरी जिल्हयातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी हे त्यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सोबत जोडलेल्या परिपत्रकातील दिलेल्या तरतुदी बाबत अवगत करतील व त्यामध्ये दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करून घेतील.

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे उक्त परिपत्रकातील सर्व सुचनांत बाबत अधिनस्त प्रभारी अधिकारी तसेच दुय्यम अधिकारी/ अंमलदार यांना परिपत्रकाच्या निदर्शनाचे प्रभावी अंमलबजावणी करून घेतील.

सहपत्र- परिपत्रक पाने-२

**( कुमार चिंता)**
पोलीस अधीक्षक , यवतमाळ

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ जिल्हा,सर्व ठाणेदार यवतमाळ जिल्हा, सर्व शाखा प्रभारी अधिकारी,पो.अ.कार्यालय यवतमाळ.पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष, यवतमाळ,पोलीस उपअधिक्षक (मुख्या),यवतमाळ, परिपत्रकाचे अनुषंगाने उचीत कार्यवाहीकरीता

प्रत - अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रत सविनंय सादर - मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती.परिक्षेत्र,अमरावती.

circular

PDF Scanner ACE Scanner

6 MAY 2025

1370

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक :- पोमसं/२१/७२७२/ई-ऑफिस क्र.१९११७४/२०२५ मुंबई, दिनांक:-०६/०५/२०२५

विषय :- गुन्हयांचे तपासाकामी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्यातून बाहेरील राज्यात जाण्याची परवानगी मिळणेबाबत.

******

महाराष्ट्र राज्यातून इतर राज्यात शासकीय कामासाठी जाताना पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२३/५४/राज्या बाहेर तपास करण्याची परवानगी/२०५/२०२४, दि.११/०७/२०२४ अन्वये सर्व पोलीस घटकांना कळविण्यात आले आहे.

२. तरी खालील घटक प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, या कार्यालयाचे क्र.पोमसं/२३/५४/राज्या बाहेर तपास करण्याची परवानगी/२०५/२०२४, दि.११/०७/२०२४ चे परिपत्रक सोबत जोडुन पाठविण्यात येत असुन, सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

( राज तिलक रौशन )
सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)

( अपर पोलीस महासंचालक (का.व सु.) यांचे मान्यतेने)

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह).

ACE Scanner

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/२३/५४/राज्या बाहेर तपास करण्याची परवानगी/२०५/२०२४ मुंबई, दि.११/०७/२०२४

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक १) क्र.रोमन-२८/३४/संकीर्ण/९३, दि.२५/०८/१९८३ व
२) क्र.पोमसं/२३/५४-संकीर्ण/९७, दि.०५/०२/१९९७.

**विषय :-** गुन्ह्यांचे तपासाकामी पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्यातून बाहेरील राज्यात जाण्याची परवानगी मिळणेबाबत.

*********

परिपत्रक क्र.५/२३/२०२४

महाराष्ट्र राज्यातून इतर राज्यात शासकीय कामासाठी जाताना पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये योग्य ते आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. याद्वारे पुन: सर्व पोलीस घटकांना सदर आदेश या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येत आहेत.

२. समन्स / वॉरन्ट बजावण्यासाठी गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी / अटक करण्यासाठी अथवा अन्य कारणांसाठी पोलीस पथकास राज्याबाहेर जावे लागते व त्यासाठी परवानगी मिळणेबाबत पोलीस घटक प्रमुखांकडून या कार्यालयाशी पत्रव्यवहार केला जातो. त्यामध्ये होणारा वेळेचा तसेच मनुष्यबळाचा अपव्यय टाळण्यासाठी याबावत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. :-

१) समन्स / वॉरन्ट बजावण्यासाठी पोलीस घटक प्रमुखांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम ६९, ७१ व ८० प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधीत न्यायालयास विनंती करावी. जर न्यायालयाकडून तशी परवानगी मिळाली नाही तरच समन्स / वॉरन्ट बजावण्याबाबतची कार्यवाही करावी.

२) शोध कार्यासाठी अथवा तपासासाठी पोलीस अधिकारी/अंमलदार यांना महाराष्ट्र राज्या बाहेरील इतर राज्यात (फक्त भारतीय सीमेअंतर्गत) जाण्यासाठी पोलीस अधीक्षक / परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / परिक्षेत्रीय पोलीस उप महानिरीक्षक / पोलीस आयुक्त हे परवानगी देण्यास सक्षम अधिकारी राहतील. उपरोक्त कामासाठी जर शासकीस वाहनांचा वापर करणे आवश्यक असेल तर तशी परवानगी परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / परिक्षेत्रीय पोलीस उप महानिरीक्षक / पोलीस आयुक्त यांचेकडून घेण्यात यावी.

३) तपासकामासाठी अथवा इतर कोणत्याही कारणांसाठी पोलीस अधिकारी / अंमलदार यांना जर देशाबाहेर पाठ्वावयाचे असेल तर त्यासाठी पोलीस महासंचालक व शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. कोणत्याही पोलीस अधिकारी / अंमलदार यांना पुर्व परवानगी शिवाय देशाबाहेर पाठविण्यात येऊ नये.

**(पोलीस महासंचालक यांचे आदेशान्वये)**

Sanjay 10/07/24

(संजय सक्सेना)
अपर पोलीस महासंचालक (का.व सु.)

**प्रति,**

**सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)**
**सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक**
**सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)**

२/-

PDF Scanner ACE Scanner